आजचा सुविचार
जर तुम्हाला लवकर पुढे जायचे असेल
तर एकटे चला परंतु
जर तुम्हाला दूरवर जायचे आहे,
तर सर्वांना सोबत घेऊन चला...
– रतन टाटा

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

आतील पानात

- नवरात्री उत्सवाचे पालटलेले स्वरूप !
- मराठी साहित्याचा विश्वास...
- ड्रोनच्या दिव्यांनी खड्डे बुजत नाहीत, जनता फसत नाही भाजपा आणि आप मध्ये वादाची ठिणगी...


वर्ष : ०५ | अंक : ३४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.१८ सप्टेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## जळगावात हायव्होल्टेज घडामोडी, आधी मोर्चा, मग सभा, नंतर




**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.१७, जळगाव :**
जळगावच्या जिल्हाधिकारी कार्यालयात आज अभूतपूर्व असा गोंधळ झालेला बघायला मिळाला. आंदोलक शेतकरी हे चांगलेच आक्रमक झालेले बघायला मिळाले. शेतकरी कर्जमाफी व्हावी, यासह अनेक मागण्यांसाठी शेतकऱ्यांनी मोर्चा काढला होता. आपल्या या मोर्चाची दखल प्रशासनाने घ्यावी. जिल्हाधिकाऱ्यांनी आंदोलनस्थळी येत निवेदन द्यावे. जिल्हाधिकाऱ्यांना स्वत: येणं जमलं नाही तर जिल्हाधिकारी कार्यालयातून दुसऱ्या कुठल्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्याने आंदोलनस्थळी येवून निवेदन स्वीकारावे, अशी आंदोलक शेतकऱ्यांची इच्छा होती. पण त्यांची ही इच्छा पूर्ण न झाल्यामुळे शेतकरी आणखी आक्रमक झाले. शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालयावर चालून गेले. यावेळी त्यांनी परवानगी नसताना गेट उघडून आतमध्ये प्रवेश केला आणि जोरदार घोषणाबाजी केली. शेतकऱ्यांच्या घोषणाबाजीने जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर दणाणून गेला.

जळगावमध्ये शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांबाबत मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चाचं रुपांतर नंतर सभेत झालं होतं. या सभेवेळी माजी खासदार उन्मेष पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांचं निवेदन घेण्यासाठी सभास्थळी यावं, असं आवाहन केलं होतं. तसेच शेतकऱ्यांची देखील तशीच मागणी होती. पण सभा संपली तरी जिल्हाधिकारी कार्यालयातून कुणी आलं नाही. त्यामुळे आंदोलकांनी सभास्थळाहून आपला मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयाकडे वळवला.

बच्चू कडू, उन्मेष पाटील हे देखील आंदोलक शेतकऱ्यांसमोर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उभे राहिले. ते जिल्हाधिकाऱ्यांच्या भेटीसाठी गेटबाहेर उभे होते. पण त्यांना आतमध्ये जाण्यासाठी परवानगी मिळू शकली नाही. त्यामुळे आंदोलक शेतकरी आक्रमक झाले. निवेदन देण्यासाठी केवळ पाच जणांना आतमध्ये जाण्यास परवानगी मिळेल, असं पोलिसांनी सांगितलं. पण आंदोलकांना ते मान्य नव्हतं. त्यामुळे गेटबाहेर आंदोलकांचा गदारोळ झाला.

यानंतर बच्चू कडू यांनी स्वत: गेट उघडलं. त्यानंतर सर्व शेतकरी आतमध्ये शिरले. बच्चू कडू आणि उन्मेष पाटील यांच्यासह ३० ते ३५ शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालयात शिरले. त्यांच्याकडून जोरदार घोषणाबाजी यावेळी करण्यात आली. 'जय जवान जय किसान', 'शेतकरी कर्जमाफी झालीच पाहिजे', अशा घोषणा आंदोलक शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात घुसताना केली.

## ग्रामपंचायत दहेली जुनी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाला सुरुवात



**अक्षराज : वसंत वडस्कर**
**दि.१७, चंद्रपूर :** राष्ट्रनेता मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसा निमित्य व मराठा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासन ग्राम विकास व पंचायतराज विभाग, सशक्त पंचायत समृद्ध महाराष्ट्र करण्याकरिता मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाला ग्रामपंचायत दहेली (जुनी) येथे सुरुवात झालेली आहे. अभियानाचे मुख्य ६ घटक असून १) सुशासन युक्त गाव २) गाव पातळीवरील संस्था सक्षमीकरण ३) लोकसहभाग व श्रमदान माध्यमातून लोकचळवळ निर्माण करणे ४) जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव ५) मनरेगा व इतर योजनांची अभिसरण ६) सक्षम पंचायत उपजीविका विकास व सामाजिक न्याय या घटकांच्या माध्यमातून वैशिष्ट्यपूर्ण अभियान दिनांक १७/९ /२०२५ ते १/ १२ /२०२५ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या अभियानाचे शुभारंभ व लोकांना मार्गदर्शन करण्याकरिता ग्राम पंचायत कार्यालय द्वारे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. माजी उपसभापती बल्लारपूर विलास बोबडे, माजी सरपंच आबाजी देरकर, ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचारी, ग्रामवासी यांच्या उपस्थितीत या अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. अभियान अंतर्गत स्वच्छता ही सेवा या उपक्रमाने अभियानाची सुरुवात करण्यात आली. यामध्ये मोठ्या संख्येने ग्रामवासियांचा सहभाग लाभला.

## महिला प्रवाशाचे सोन्याचे दागिने हिसकावले

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.१७, पुणे :**
शहरात पीएमपी प्रवासी महिलांच्या दागिने चोरीच्या घटना वाढत असताना महापालिका भवन परिसरात सोमवारी घडलेल्या घटनेत पीएमपी वाहकाच्या तत्परतेमुळे चोरटा रंगेहाथ पकडला गेला. वाहकाच्या धाडसी भूमिकेमुळे महिलेचे दागिने परत मिळाले असून, प्रवाशांनी वाहकाचे कौतुक केले आहे.

या प्रकरणात पोलिसांनी लखन सुहास जाधव, वय ३० वर्ष, रा. सर्वोदय कॉलनी, मुंढवा, याला अटक केली असून, त्याचा साथीदार चांद शेख, रा. मुंढवा, फरारी आहे. या प्रकरणी शिरूर येथील ५६ वर्षीय महिलेने शिवाजीनगर पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.

**नेमकं काय घडलं?**

तक्रारदार महिला सोमवारी सायंकाळी पीएमपी बसने सणसवाडी येथून प्रवास करत महापालिका भवन येथे उतरल्या. त्या वेळी आरोपी जाधव आणि शेख या दोघांनी महिलेला उतरायला मदत करण्याचा बहाणा करून त्यांची पिशवी धरून ठेवली. गोंधळात जाधवने कटरने महिलेच्या हातातील सोन्याची बांगडी तोडली आणि बसमधून उडी मारून पसार होण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार लक्षात आल्याने वाहकाने तत्काळ धाव घेऊन पाठलाग केला आणि जाधवला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले.

# मोठी बातमी! मनोज जरांगे यांची दिल्लीला जाण्याची घोषणा




**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.१७, मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या वेळेस मराठ्यांना दगा देतील, असं वाटत नाही. त्यांनी तसं केलं तर त्यांचं राजकीय करिअर खल्लास. समाजापेक्षा मोठा कुणीही नाही. भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना असे कोणीही नाही. जातीपेक्षा मोठं कुणी नाही. हे एकदा सोयीला लागलं, मराठवाड्याचं आणि पश्चिम महाराष्ट्रासाठी गॅझेटियर लागू झालं की एकदा दिल्लीला जावू, अशी मोठी घोषणा मनोज जरांगे पाटील यांनी केली. पण दिल्लीला आंदोलनासाठी नाही तर आनंदाचा सोहळा म्हणून जाऊ, असं जरांगे यांनी यावेळी स्पष्ट केलं.

पूर्ण भारतातील मराठा एकत्र येणार आहेत. दिल्लीच्या मराठ्यांनी नियोजन केलं आहे. तीन दिवस प्रोग्राम असणार आहे. हरियाणा, पंजाब, गुजरात, बिहार, कर्नाटक सगळ्या राज्यातून आमचे मराठा बांधव एकत्र करण्याचं ठरलं आहे, असा प्लॅन मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी सांगितला.

मला एक सांगा, नुसता इतिहास ऐकून उपयोग आहे का? आपल्याला काय करायचं आहे ते महत्त्वाचं आहे. तिथे मागणी घेऊन जायचं नाही. आपल्या राजाने अटकेपार झेंडा फडकवला. दिल्लीला सुद्धा झेंडा फडकवला. ते प्रत्यक्ष बघायला पाहिजे. त्याशिवाय मजा नाही. आपल्यातल्या बऱ्याच बांधवांनी मुंबई सुद्धा बघितली नव्हती. मस्तपैकी बघितल की नाही?, असा प्रश्न मनोज जरांगे यांनी आपल्या समर्थकांना विचारला.

मला पहिल्यांदा माहीत झालं की त्या बॅरिकेट्सला चाकं असतात. त्यावर एक म्हतारे बाबा बसले. तिथे पोलीस भाऊ आले. ते म्हणाले, बाबा बाजूला सरका. तर बाबा म्हणाले, फक्त एक चक्कर मारतो, अशी मिश्किल आठवण मनोज जरांगे पाटील यांनी सांगितली.

जरांगे पाटील यांनी केले मुख्यमंत्र्यांचे कौतुक

दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे जाहीर सभेत कौतुक केले. कौतुक करताना त्यांनी देवेंद्र फडणवीस यांना काका ही उपाधी देखील दिली. फडणवीस काकांनी मराठ्यांसोबत जुळवून घेतलं आहे. त्यांनी आता हैदराबाद गॅझेटचे प्रमाणपत्र देण्यास सुरुवात केली आहे. त्यांनी आमचं भलं केलं. आम्ही त्यांचं कौतुक करू. त्यांच्यासोबत राहू, असं वक्तव्य मनोज जरांगे पाटील यांनी धाराशिव येथे केलं.

आम्ही वर्षा बंगल्यावर आणि त्यांच्यावरही गुलाल उधळणार. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यावरही गुलाल उधळणार आहोत. आमच्या आरक्षणाचा प्रश्न सुटला की आम्ही गुलाल उधळणार. त्यांनी आमचा प्रश्न सोडवला मग आम्ही त्यांचं कौतुक करणारच, असंही जरांगे पाटील म्हणाले.

## नुकसानीचे तातडीने पंचनामे करा: आ. काशिनाथ दाते

### खडकवाडी परिसरातील नुकसानग्रस्त पिकांची केली पाहणी



**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.१७, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यात गेल्या दोन ते तीन दिवसापासून सतत मुसळधार पाऊस पडत आहे. या पावसामध्ये शेती पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. खडकवाडी येथील शेतकरी विकास रोकडे यांच्या नऊ एकर क्षेत्रावर असलेल्या झेंडू पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. ही झेंडूची फुले बाजारात विकण्या योग्य न राहिल्यामुळे ती फेकून द्यावी लागणार आहेत. खडकवाडी परिसरातील तसेच तालुक्यातील नुकसान झालेल्या सर्व शेती पिकाचा पंचनामा कृषी अधिकाऱ्यांनी करावा या संदर्भात सूचना देण्यात आल्या असून सबंधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करून शेतकरी वर्गाला न्याय देणार असल्याचे आमदार काशिनाथ दाते यांनी सांगितले आहे.

खडकवाडी येथील विकास रोकडे यांच्या नुकसान झालेल्या शेतीमध्ये जाऊन आमदार दाते यांनी भेट दिली व संबंधित अधिकाऱ्यांना पंचनामा करण्याच्या सूचना दिल्या आहेत. यावेळी कृषी अधिकारी तसेच तलाठी व यावेळी शेतकरी विकास रोकडे, डॉ. किशोर उर्फ बाबासाहेब ढोकळे, किरण वाबळे, साबाजी गागरे, विकास रोकडे, पंकज गागरे, गणेश चौधरी, काशिनाथ रोहकले, अरुण गागरे, सखाराम नवले, प्रसाद कर्णावट, अक्षय ढोकळे, आदी खडकवाडी येथील ग्रामस्थ शेतकरी यावेळी उपस्थित होते.

खडकवाडी येथील प्रगतिशील शेतकरी विकास विठ्ठल रोकडे यांच्या नऊ एकरांवरील झेंडू पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच, विजय पवार आणि शेखर हुलावळे यांच्या झेंडू पिकालाही याचा फटका बसला आहे.

सततच्या पावसामुळे शेतात पाणी साचले असून, झेंडूची फुले सडू लागली आहेत. त्याचबरोबर कांदा आणि बाजरी पिकांचेही नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे पिकांच्या नुकसानीची पाहणी आणि पंचनामा करण्याची मागणी केली आहे. आमदार काशिनाथ दाते यांनी स्वतः शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनामा करण्याचे आदेश दिले आहेत.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, कृषी विभागाने त्वरित पाहणी करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. सततच्या पावसाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असून, आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना प्रशासनाकडून तातडीने आर्थिक मदत मिळावी, अशी अपेक्षा आहे.

## रानभाजी महोत्सव तरुण पिढीसाठी आरोग्य मंत्र! - माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर

**अक्षराज : सुरेश संकपाळ**
**दि.१७, पाटण :** पाटण तालुका हा सह्याद्रीच्या कुशीत वसलेला तालुका आहे. येथील परिसर निसर्गसंपन्न दर्या खोऱ्यांनी नटलेला आहे. येथील दाट जंगलात विविध प्रकारच्या औषधी वनस्पतींच्यासह विविध प्रकारच्या रानभाज्या सुद्धा खूप प्रमाणात आढळतात. मात्र, आधुनिक जीवनशैलीमुळे आणि पाश्चिमात्य अन्नसंस्कृतीच्या प्रभावामुळे आजच्या तरुण पिढीस या रानभाज्यांचे ज्ञान कमी होत चालले आहे. शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती, युवक मंडळे, आणि स्वयंसेवी संस्था यांनी पुढाकार घेऊन रानभाजी महोत्सवाचे आयोजन करावे आणि पुढच्या पिढीसाठी हा नैसर्गिक वारसा जपावा असे प्रतिपादन माजी सार्वजनिक बांधकाम मंत्री विक्रमसिंहजी पाटणकर यांनी केले ते बी डी कॉलेज पाटण वनस्पतीशास्त्र विभाग व रोटरी क्लब पाटण यांचे संयुक्त विद्यमाने रानभाजी व तृणधान्य महोत्सवा ते बोलत होते

यावेळो कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक, युवा नेत श्रीमंत याज्ञसेन पाटणकर व संजीव चव्हाण प्राचार्य डॉ शिरीष पवार, प्रा. डॉ बी व्ही जाधव, रो. किशोर तुळसनकर, प्रा डॉ हेमलता काटे , प्राचार्य चेतन सावंत, प्रा. एस.ए.गायकवाड याची प्रमुख उपस्थिती होती.



विक्रमसिंहजी पाटणकर म्हणाले की, आपल्याकडे सह्याद्रीच्या दर्याखोऱ्यात उगवणाऱ्या अनेक औषधी गुणधर्म असलेल्या रानभाज्या आहेत त्या आपल्या आरोग्यासाठी उपयोगी आहेत .ज्यांना याची माहिती आहे त्यांनी हा वसा पुढच्या पिढीला दिला पाहिजे. या भाज्या मध्ये भरपूर प्रमाणात लोह, कॅल्शियम, फायबर्स, अँटीऑक्सिडंट्स आणि जीवनसत्त्वे आढळतात. विशेषतः आजच्या धकाधकीच्या जीवनात रानभाज्या हे नैसर्गिक 'डिटॉक्स फूड' म्हणून उपयोगी ठरतात .

यामध्ये महोत्सवात ९० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये भारगा, टाकळा, वाईवरण, कोकणतोंडा, शेंडवळ, आळंबी, भोकर, उंबर, मुरड, अशा वेगवेगळ्या भाज्या वापरून विद्यार्थ्यांनी अतिशय रुचकर भाज्या बनविल्या होत्या.

परीक्षकांनी स्पर्धेची पाहणी करून स्पर्धकांना रोख पारितोषिक देण्यात आली. रानभाजी महोत्सव स्पर्धे साठी परीक्षक म्हणून, प्रा. एस.ए. गायकवाड, प्रा. अनिल पाटील,प्रा. प्रवीण गायकवाड, प्रा.डॉ. रचना थरवल यांनी काम पहिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. बी.व्ही.जाधव यांनी केले. आभार प्रा डॉ मंजुषा शिंदे यांनी मानले.

## मुंबई-गोवा महामार्गावर थरारक अपघात; ट्रकची एका मागोमाग एक वाहनांना भीषण धडक

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.१७, रत्नागिरी :** मुंबई–गोवा महामार्गावर थरारक अपघात झाला आहे. रत्नागिरीच्या हातखंबा गावात हा अपघात घडला आहे. कोळसा वाहतूक करणाऱ्या ट्रकची एका मागोमाग एक सहा गाड्यांना धडक बसली आहे. या थरारक अपघातात एक जण ठार झाला आहे, तर चार जण जखमी झाले आहेत. जखमींना तात्काळ जिल्हा शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले आहे. सततच्या अपघातांमुळे हातखंबा ग्रामस्थ भीतीच्या छायेत आहेत.

धडक बसलेल्या वाहनांमध्ये आरटीओ विभागाच्या गाडीचाही सम ावेश आहे. परिणामी महामार्गावर काही काळ वाहतूक कोंडी झाली आहे. पोलिसांनी अपघाताची माहिती मिळताच



घटनास्थळ गाठले असून परिस्थिती पूर्ववत करण्याचा प्रयत्न सुरु आहे.

# संपादकीय

## कुमकुवत लोकशाही असलेल्या देशातच अराजकता

भारताच्या शेजारी देशात भयानक अराजकता माजली आहे. श्रीलंका आणि बांगलादेशांत जे घडले तेच नेपाळमध्ये घडत आहे. नेपाळच्या के पी शर्मा ओली सरकारने सोशल मीडियावर बंदी घातल्यावर तेथील तरुणाईने ( जेन झी ) मोठा उठाव केला. हा उठाव इतका मोठा होता की नेपाळचे पंतप्रधान के पी शर्मा ओली यांना पदावरून पाय उतार व्हावे लागले. त्यांच्या मंत्रीमंडळातील सहकाऱ्यांना आंदोलकांनी पळू पळू मारले. त्यांची धिंड काढली. नेपाळच्या माजी पंतप्रधानांच्या पत्नीला जिवंत जाळले. राजकीय नेत्यांची घरे जाळली. सरकारी कार्यालयाला आगी लावल्या. नेपाळची संसद आणि सर्वोच्च न्यायालय जाळून खाक केले. या आंदोलनात ५१ नागरिक मरण पावले तर १३०० हून अधिक नागरिक जखमी झाले. नेपाळमध्ये जे घडले तेच श्रीलंकेमध्ये तीन वर्षापूर्वी घडले. बांग्लादेशातही मागील वर्षी तेच घडले. श्रीलंका आणि बांगलादेशच्या पंतप्रधानांना सत्ता सोडून परदेशात पळ काढावा लागला. त्याचीच पुनरावृत्ती नेपाळमध्ये झाली. नेपाळचे पंतप्रधान के पी शर्मा ओली हेही देश सोडून पळून गेले त्यामुळे नेपाळच्या माजी सरन्यायाधीश सुशीला कार्की यांनी नेपाळच्या हंगामी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतली. बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी बांगलादेश सोडून भारतात आश्रय घेतल्यावर तिथे राजकारणाबाहेरील व्यक्ती असलेल्या मोहम्मद युनूस यांच्याकडे बांगलादेशचे हंगामी पंतप्रधानपद सोपवण्यात आले. मोहम्मद युनूस हे नोबेल पुरस्कारविजेते व्यक्ती आहे. त्यांनी बांगलादेशची सूत्रे स्वीकारल्यानंतर सर्वत्र त्याचे स्वागत करण्यात आले. भारतानेही त्याचे स्वागत केले त्यांच्या कार्यकाळात बांगलादेश आणि भारताचे संबंध दृढ होतील असा विश्वास भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला होता मात्र झाले उलटेच. मोहम्मद युनूस बांगलादेशचे लष्कर आणि मुलतत्ववाद्यांच्या नादी लागून भारतविरोधी कारवाया करू लागले. चीन आणि पाकिस्तानच्या कच्छपी लागून ते भारताला शत्रू मानून भारताच्या खोड्या काढू लागले. आता नेपाळची सूत्रेही राजकारणाबाहेरील व्यक्तीकडे गेली आहेत त्यामुळे नेपाळमध्येही बांगलादेशची पुनरावृत्ती होते की काय अशी शंका येते. नेपाळमध्ये सत्तेची सूत्रे आता राजकारणाबाहेरच्या व्यक्तीकडे गेली असली तरी राजकीय तरबेज व्यक्तीला देशाबाहेर घालवण्या इतपित तिथे उलथापालथ घडली आहे.( ...की घडवली गेली ? ) राजकीय छक्के पंजे, गुंतागुंतीचे डावपेच नीटसे माहीत नसलेल्या नेपाळच्या या नव्या पंतप्रधानांना तेथील लष्कर व अन्य लोक कळसूत्री बाहुली बनवून ठेवणार नाहीत कशावरून ? बांग्लादेशात आपण हे पाहिले आहे. नेपाळमधील या अराजकतेमागे बाह्य शक्तीचा हात आहे हे लपून राहिले नाही. श्रीलंका, बांगलादेश, नेपाळनंतर कोण ? असा प्रश्न सोशल मीडियावर विचारला जात आहे. काही जण याचे उत्तर भारत असे देत आहे. श्रीलंका, बांगलादेश आणि नेपाळ प्रमाणे भारत ही अराजकतेच्या वाटेवर आहे असे बिंबवण्याचे प्रयत्न चालू आहे. जे श्रीलंका, बांग्लादेश आणि नेपाळमध्ये घडले तेच भारतातही घडवण्यासाठी काही मूलतत्ववादी, अतिरेकी, देशद्रोही घटक व येथील पाताळयंत्री राजकारणी उतावीळ असल्याचे दिसते. जागतिक पटलावर भारताचे वाढते वर्चस्व सहन न होणाऱ्या हित शत्रूंचा भारतातही अराजकता माजवून भारताला कुमकुवत करण्याचा डाव आहे मात्र त्यांचा हा डाव यशस्वी होणार नाही कारण भारतातील नागरिक सुज्ञ असून लोकशाही मानणारे आहेत. भारतीय लोकशाही जगातील सुदृढ लोकशाही आहे. कुमकुवत लोकशाही असलेल्या देशातच अराजकता माजत आहे. भारताची लोकशाही कमकुवत नाही तर ती सुदृढ आहे. भारतासारख्या सुदृढ लोकशाही असलेल्या देशात कधीही अराजकता माजू शकत नाही. संविधान हा आपल्या लोकशाहीचा पाया आहे. अनेक जाती, धर्म, पंथ, भाषा, संस्कृती असूनही आपला देश एकसंध आहे तो केवळ आपल्या संविधानामुळे. बाबासाहेबांनी लिहिलेल्या संविधानामुळेच आपला देश एकसंध आहे. भारतासोबत स्वातंत्र्य झालेल्या शेजारील देशात अनेकदा उठाव, बंड झाले. काही देशात लोकशाही जाऊन हुकुमशाही आली. काही देशावर लष्कराने ताबा मिळवला आपल्या देशात मात्र अजूनही लोकशाही आहे म्हणजेच लोकांचे राज्य आहे. जोवर या देशात बाबासाहेबांनी लिहिलेले संविधान आहे आणि जोवर आपल्या देशात लोकशाही आहे. जोवर देशात लोकशाही आहे तोवर या देशात अराजकता मानणार नाही.

# मराठी साहित्याचा विश्वास...



९९ व्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक आणि पानिपतकार विश्वास पाटील यांची निवड यंदा बहुमताने करण्यात आली. साहित्यिकांच्या सरकारी पैशाने मिरवण्याचा उत्सव असे जे स्वरूप या उत्सवाला आले होते त्याला यंदा विश्वास पाटील यांच्यासारख्या समर्थ साहित्यिक आणि कादंबरीकाराच्या निवडीमुळे छेद दिला गेला, असे म्हणावे लागेल. विश्वास पाटील हे नाव साहित्य जगतात आदराने घेतले जाते. ते सनदी अधिकारी तर होतेच पण 'पानिपत', 'महानायक' आणि 'झाडाझडती'सारख्या काही प्रचंड गाजलेल्या कादंबऱ्यांचे लेखकही आहेत.त्यामुळे साहित्यिक म्हणून त्यांचा दरारा कायम आहे. यापूर्वी काही अध्यक्ष होऊन गेले. मध्यंतरी साहित्य संमेलने नकोतच असे म्हणणारा गट निर्माण झाला होता. पण संमेलनं चालू आहेत. विश्वास पाटील यांच्याबाबतीत त्यांचे प्रत्येक लेखन हे आदरास पात्र असते. भले ते कुणाला आवडो अथवा न आवडो पण साहित्यिक म्हणून त्यांचे मूल्यमापन करता येईल. त्यादृष्टीने विश्वास पाटील यांची निवड ही अत्यंत योग्य आहे. साताऱ्यासारख्या शहरात होणाऱ्या संमेलनात ती यथार्थ आहे. साहित्य संमेलन आणि वाद काही नवे नाही. अगदी पहिल्या संमेलनात म्हणजे १८७८ साली झालेल्या साहित्य संमेलनात वाद गाजला होता, तो म्हणजे तेव्हाचे वंचितांचे पुढारी महात्मा जोतिबा फुले यांना आमंत्रण देऊनही ते स्वीकारण्यास त्यांनी नकार दिला होता आणि त्यामुळे हा वाद गाजला होता. १९७५ च्या साहित्य संमेलनात तर दुर्गा भागवत यांनी मंत्री यशवतराव चव्हाण यांना व्यासपीठावर बसण्यास मनाई केली होती. त्यामुळे यशवंतराव तेव्हा सभागृहात बसले होते. साहित्य समेलनांना वादाची पार्श्वभूमी आहे. यापूर्वी झालेल्या साहित्य संमेलनात सरकारी हस्तक्षेपामुळे संमेलनच नको म्हणून ते गाजले होते. याला अपवाद गेल्या वर्षी दिल्ली येथे झालेल्या साहित्य संमेलनाचाही करता येणार नाही. कारण त्या संमेलनात सरकारी हस्तक्षेप सरळ सरळ दिसत होता. सरकारी हस्तक्षेपास कुणाचाच विरोध नाही, पण त्यालाही एक मर्यादा हवी. पण साहित्यिकच आपल्या माना जर राजकारण्याच्या हातात देणार असतील तर मग त्यांना दोष देता येणार नाही. आजवर असेच होत आले आहे. दुर्गा भागवतांसारखे अपवाद सोडले तर बरेचसे साहित्यिक सरकारपुढे नांग्या टाकणारे ठरले आहेत. विश्वास पाटील यांच्याबाबतीत तसे म्हणता येणार नाही. सरकारपुढे नांग्या टाकू नका.




याचा अर्थ नेहमीच त्यांच्याविरोधात तलवारी उपसून बसा असेही नाही. पण योग्य वेळी आपला स्वाभिमान दाखवला पाहिजे.


विश्वास पाटील यांनी सरकारी नोकरी करताना वेळोवेळी तसा स्वाभिमान दाखवला आहे; परंतु विश्वास पाटील यांच्याबाबतीत असे वाद होण्याची शक्यता दिसत नाही, कारण त्यांचे साहित्यिक स्थान आज प्रचंड उंच आहे आणि त्यामुळे त्यांच्यावर कुणी प्रश्नचिन्ह उपस्थित करणार नाही. शिवाय विश्वास पाटील यांची निवड एकमताने झाली आहे. मुख्य प्रश्न हा आहे, की मराठी साहित्य वाचणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे आणि मराठी वाचन तर हल्ली दुर्मीळच झाले आहे. त्याबाबतीत विश्वास पाटील हे काही तरी करू शकतील. त्यांनीच सांगितले आहे, की नुसते एक गाव वाचनालयाचे म्हणून चालणार नाही तर गावोगावी वाचनालय चळवळ सुरू करावी लागेल. याबाबतीत विश्वास पाटील यांनी वर्षभराच्या मुदतीत काही तरी ठोस करावे हीच अपेक्षा त्यांच्याकडून आहे. आज मराठी साहित्यापुढे अनेक प्रश्न आहेत. मराठी शाळा बंद पडत आहेत आणि मराठी लोक महाराष्ट्रापासून दूर जात आहेत. परभाषिकांनी आक्रमण केले आहे आणि प्रत्येक क्षेत्रात मराठी लोक मागे हटत आहेत किंवा हटवले जात आहेत. याबाबतीत विश्वास पाटील यांनी चळवळ उभारावी हे अपेक्षित आहे. कारण त्यांनी वाचनालय चळवळ उभारण्याचे संकेत दिले आहेत तसेच ते मराठी शाळा वाचवण्यासाठी काही तरी करतील. प्रत्येक मराठी साहित्य संमेलनाने या अगोदर शब्द दिला होता. पण पुढे काहीही झाले नाही. मराठी वाचकांची संख्या फारच कमी आहे आणि आपल्याकडे ना. सी. फडके, आचार्य अत्रे वगैरे वाचणाऱ्यांची पिढी एकेकाळी होती, ती आता अस्तंगत झाली आहे. नव्या पिढीला हॅरी पॉटर वाचण्याचे वेड आहे आणि तेही जाऊन आता मोबाइल आणि इतर गॅझेटचे वेड आहे. त्यापासून नव्या पिढीला वाचवायचे कसे असा यक्षप्रश्न आहे. तो विश्वास पाटील आणि त्यांच्यासारख्या साहित्यिकांवर ही फार मोठी जबाबदारी आहे. कारण त्यांच्यावरच हे शिवधनुष्य पेलण्याची ताकद आहे आणि त्यांच्याकडे तितकी प्रतिभाही आहे.

विश्वास पाटील हे शेतकरी कुटुंबातून आलेले. त्यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील नेर्ले येथे झाला. त्यांचे वडील चौथी पास होते, तर आईने शाळाही पाहिली नाही. त्यांचा विश्वास हा पुत्र आज सनदी अधिकारी म्हणून निवृत्त झाला. त्यांनी प्रचंड गाजलेल्या कादंबऱ्या लिहिल्यात. 'पानिपत' आणि 'महानायक' ही सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनावरील कादंबरी प्रचंड गाजली. शेतकरी कुटुंबातून आलेल्या विश्वास यांना ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांची दुःखे आणि वेदना यांचा जवळून परिचय होता, पुढे ते शासकीय सेवेत रुजू झाले तेव्हा त्यांच्या ते कामी आले. शासकीय सेवेत असताना त्यांनी शासकीय योजनांचा लाभ लोकांना कसा देता येईल हे पाहिले. पण त्यांच्या साहित्यिक योगदानाविषयी बोलताना असे म्हणता येईल, की त्यांची साहित्यिक वीण ही त्यांना कादंबरी लेखनाकडे घेऊन गेली. 'महानायक' असो की 'झाडाझडती' या सर्व कादंबऱ्यांतून उपेक्षित वर्गाची तडफड दिसते. पानिपतचा अपवाद वगळता त्यांची ही उपेक्षितांची तडफड नेहमीच केंद्रस्थानी राहिली आहे. साहित्य संमेलन म्हणजे केवळ तीन दिवस मिरवण्याचा उत्सव ही प्रथा विश्वास पाटील बदलून टाकतील यात काही शंका नाही. साहित्य चळवळ खऱ्या अर्थाने जनसामान्यांची चळवळ कशी होईल हे पाटील पाहतील यात शंका नाही. विश्वास पाटील यांच्या निवडीने एक सर्वोत्कृष्ट कादंबरीकार आणि साहित्यिकाची निवड झाली आहे. त्यांच्याकडून मराठी रसिकांना अपेक्षाही तितक्याच आहेत.

# नवरात्री उत्सवाचे पालटलेले स्वरूप !

महिषासुराच्या नाशासाठी अवतार घेणार्या श्री दुर्गादेवीचा उत्सव म्हणजे नवरात्र ! नवरात्र हे देवीचे व्रत असून महाराष्ट्रासह अनेक ठिकाणी हे व्रत कुलाचार म्हणून पाळले जाते. या व्रतात नऊ दिवस व्रतस्थ राहून देवीची मनोभावे आराधना केली जाते. आज अनेक राज्यांत याला उत्सवाचे स्वरूपही आले आहे. देवीने ९ दिवस महिषासुराशी युद्ध करून दहाव्या दिवशी त्याचा वध केला याचे प्रतीक म्हणून गुजरातमध्ये दांडिया खेळला जातो. दांडिया म्हणजे देवीच्या हातातील शस्त्र असून पूर्वी युद्धाच्या अविर्भावात तो खेळला जात असे. कालांतराने त्याला आता नृत्याचे स्वरूप आले आहे. महाराष्ट्रापासून गुजरात जवळच असल्याने गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातही नवरात्री हा उत्सवासारखा साजरा होऊ लागला आहे. त्यानिमित्ताने इथेही रासगरबा आणि दांडिया खेळला जाऊ लागला आहे. हिंदूंच्या धार्मिक उत्सवांचे बाजारीकरण होऊ लागले आहे त्यापासून नवरात्री उत्सवही मागे राहिलेला नाही. नवरात्री उत्सवाचे मुंबईसारख्या शहरांत इव्हेंट होऊ लागले आहेत. धनाढ्य उद्योगपती, राजकारणी मोठी मैदाने आरक्षित करून याठिकाणी नऊ दिवस गरब्याचे कार्यक्रम आयोजित करतात. या इव्हेंटमध्ये मोठमोठे वाद्यवृंद, गायक आणि सिनेसृष्टीतील कलाकारांना बोलावून लोकांना आकर्षित केले जाते. स्पर्धांचे आयोजन करून प्रतिदिन उत्कृष्ट नृत्य आणि वेशभूषा करणाऱ्यांना बक्षिसे दिली जातात. गरब्यात सहभागी होणाऱ्यांसाठी शेकडो रुपयांची प्रवेश फी आकारली जाते. श्रीमंतांची मुले या कार्यक्रमांत हिरीरीने सहभागी होतात.

नवरात्र हा खरेतर देवीच्या उपासनेचा उत्सव मात्र हल्ली जसे दहीहंडी उत्सवांत दहीहंडी नावाला आणि केवळ मानवी मनोऱ्यांचीच स्पर्धा पाहायला मिळते त्याप्रमाणे नवरात्री उत्सवांत देवीची उपासना नगण्य आणि तरुणांची मौजमजाच अधिक पाहायला मिळते आहे. गेल्या काही वर्षांत नऊ रात्रीच्या नऊ दिवसांत वेगवेगळ्या रंगाचे वेष परिधान करण्याचा ट्रेंड फोफावला आहे ज्याला धर्मशास्त्राचाच नव्हे तर तर्कशास्त्राचाही आधार नाही. तरीही स्त्रीवर्ग यासाठी आधीच सज्ज होतो. यंदाच्या नऊ दिवसांचे नऊ रंग कोणते हे एकदा वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाले कि त्या रंगांचे कपडे आपल्याकडे सुस्थितीत आहेत का हे पाहिले जाते. नसतील तर ते खरेदी केले जातात. नऊ दिवस वेगवेगळ्या रंगांचे कपडे परिधान करायचे म्हणजे त्या रंगाला अनुसरून कानातले, गळ्यातले, नाकातले दागिनेही मॅचिंग असायला हवेत, केशभूषाही त्यानुरूप असायला हवी, मग त्यासाठी वेगळा खर्च केला जातो. स्त्री वर्गासह आता पुरुष वर्गही काही प्रमाणात या रंगसंगतीत सहभागी होऊ लागला आहे. नवरात्रीच्या निमित्ताने गरब्यात नृत्य करायला जायचे म्हणून अनेक तरुण तरुणी नवरात्रीच्या एक महिना आधीपासूनच नृत्याचे वर्ग लावून घेतात, अर्थात



नवरात्रीच्या निमित्ताने विशेष नृत्य शिकवणारे नृत्याचे वर्गही या दिवसांत मोठ्या प्रमाणात उदयास येतात. नृत्य करताना परिधान करण्यासाठी विशेष प्रकारचे पोषाखही खरेदी केले जातात. हे पोशाख विकणारेही या दिवसांत फॉर्मात असतात. हा सर्व प्रकार पूर्वी केवळ श्रीमंत वर्गात पाहायला मिळत असे; मात्र गेल्या काही वर्षांत यामध्ये मध्यमवर्गीय तरुण तरुणीही सहभागी होऊ लागले आहेत.

देवीच्या उत्सवाचे जसे बाजारीकरण होऊ लागले, तशा काही विकृतींचाही शिरकाव या उत्सवात होऊ लागला आहे. विषेषतः स्त्रीवर्ग या विकृतीला बळी पडू लागला आहे. रात्री गरबा खेळायला जाताना विविध प्रकारचे टॅटू अंगावर काढून घेऊन मिरवण्याचा ट्रेंड फोफावत चालला आहे. बॅकलेस ब्लाउज घालून उघड्या पाठीवर, किंवा उघड्या दंडावर विविध टॅटू काढून घेतले जातात. त्यासाठी हजारो रुपये खर्च केले जातात. काही ठिकाणी तर टॅटू काढणाऱ्यांचा धंदा तेजीत चालावा या हेतूने टॅटूच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात. ज्यांच्या अंगावरील टॅटू अधिक आकर्षक त्यांना बक्षीस दिले जाते. अशा प्रकारे शरीराचा भाग उघडा ठेऊन त्यावर टॅटू काढून मिरवण्यात कसली आली आहे भक्ती ? हे असले प्रकार देवीला तरी आवडणार आहेत का ? नवरात्रीमध्ये सार्वजनिक ठिकाणी गरबा खेळण्यास वेळेचे बंधन असले, तरी अनेक ठिकाणी हे नियम धाब्यावर बसवून रात्री उशिरापर्यंत गरबा खेळला जातो. त्यानिमित्ताने तरुण तरुणी रात्री उशिरापर्यंत घराबाहेर असतात. नवरात्री काळात संतती नियमनाच्या साधनांची नेहमीच्या तुलनेत दुप्पट विक्री होते तसेच यानंतरच्या काळात शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थिनींच्या गर्भपाताच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होते असेही एका सर्वेक्षणातून निदर्शनात आले आहे. देवीच्या उत्सवाआडून काही विकृत मनोवृत्ती भोगवादाला खतपाणी घालत आहेत हेच यातून दिसून येते. गतवर्षीप्रमाणे यंदाही काही हिंदुत्ववादी संघटनांनी गरब्याच्या कार्यक्रमांत येणाऱ्यांचे ओळखपत्र बघून केवळ हिंदूनाच प्रवेश द्यावा असे आवाहन केले होते. या आवाहनाला अनेक हिंदूंनीच विरोध केला याचे आश्चर्य वाटते. भारतातील वाढता लव्ह जिहाद सरकारचीही डोकेदुखी बनली आहे. हिंदूंच्या वंशविच्छेदावर उठलेल्या लव्ह जिहादवर निर्बंध आणण्यासाठी काही राज्यांत याविषयी कायदा करण्यात आला आहे. महाराष्ट्र सरकारही हा कायदा करण्यास अनुकूल आहे. नवरात्रीच्या काळात धर्मांध प्रवृत्ती गरब्याच्या कार्यक्रमांत शिरतात आणि हिंदू मुलींना लक्ष्य करतात, त्यांना प्रेमाच्या जाळ्यात ओढतात. दरवर्षी अशा प्रकारच्या घटना मोठ्या प्रमाणात घडतात. त्यामुळेच यंदा हे आवाहन करण्यात आले आहे. या आवाहनाला खरेतर सर्वच स्तरांतून प्रतिसाद मिळायला हवा. पूर्वी 'गरबा' या नृत्याच्या वेळी देवीची, कृष्णलीलेची आणि संतरचित गीतेच म्हटली जात असत. हल्ली मात्र भगवंताच्या या सामूहिक नृत्योपासनेला विकृत स्वरूप आले आहे. चित्रपटांतील गीतांच्या तालावर विचित्र अंगविक्षेप करून गरबा खेळला जातो. डॉल्बी, डीजेसारखे कानठळ्या बसवणारे संगीत लावले जाते. पूजास्थळी तंबाखूसेवन, मद्यपान, ध्वनीप्रदूषण इत्यादी प्रकारही घडतात. नृत्य करताना अनेक ठिकाणी महिलांच्या छेडछाडीच्या घटना घडतात, यातून मारामाऱ्या होतात. एकूणच यातून उत्सवाचा मूळ उद्देश बाजूला राहतो.

वर उल्लेख केल्याप्रमाणे नवरात्री हा देवीच्या उपासनेचा उत्सव आहे. हे नऊ दिवस देवीने महिषासुराशी युद्ध केले. दांडिया खेळणे म्हणजे देवीच्या मारक रूपाची उपासनाच आहे. यातून खासकरून महिलांनी बोध घ्यायला हवा. देवीने या नऊ दिवसांत प्रकट रूप धारण करून तम प्रवृत्तीचा म्हणजे महिषासुराचा नाश केला. स्त्रीमध्ये किती पराकोटीची शक्ती आणि सामर्थ्य आहे हेच यातून देवीने दाखवून दिले आहे. त्यामुळे महिलांनी नवरात्रीत केवळ नृत्याला आणि रंगसंगतीच्या पोशाखाला उपासना न मानता देवीच्या मारक रूपातून बोध घेऊन त्याच्या उपासनेला प्राधान्य द्यायला हवे. आजमितीला स्त्री अत्याचाराचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. कोणतेही क्षेत्र स्त्रीसाठी सुरक्षित राहिलेले नाही. सुरक्षा यंत्रणा किंवा नातेवाईक प्रत्येक वेळेस आपल्या मदतीला धावून येतीलच असे नाही यासाठी आपणच आपले संरक्षण करण्यास आणि दृष्ट प्रवृत्तीचा विरोध करण्यास सिद्ध व्हायला हवे. राजमाता जिजाऊ, झाशीची राणी लक्ष्मीबाई, पुण्यश्लोक अहल्याबाई होळकर, कित्तूरची राणी चेन्नमा अशा एकनाअनेक कितीतरी शक्ती उपासक पराक्रमी स्त्रिया या मातीत होऊन गेल्या. आजच्या स्त्रियांना त्यांचाचआदर्श घेण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

हिंदू धर्मातील सण उत्सव यांमध्ये भगवंताची भक्ती आणि उपासना यांना प्राधान्य असायला हवे; मात्र त्यांचे निमित्त साधून चंगळवादाला आणि भोगवादाला खतपाणी दिले जात असेल तर ते कुठेतरी थांबायला हवे.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## औत्सुक्य..



सत्ता इच्छा हो तरूण
येवू दे भलेही वार्धक्य
विश्वास हवा स्वतावर
पुन्हा मिळवी मतैक्य

वयाला म्हणा अनुभव
मिळवतायेई आधिक्य
जिंकतठेवावी गुलामी
प्रमाण साहेबांचेवाक्य

कोणपाहिला परलोक
उपभोग इथे आहिक्य
आजचे दिस महत्वाचे
लखलाभ घ्या त्रैलोक्य

घडवून आणू काहीही
आपण असे चाणाक्य
पक्षा दहशत अशी हो
प्रमाणफक्त ममवाक्य

सोयरिक करा म्हणता
जमून आणावे गणैक्य
निर्णय नसांगे घाईघाई
ताणून ठेवा औत्सुक्य

शत्रूपक्षातही ठेवामित्र
कामाला येई सालोक्य
बावचळून जावे सगळे
निर्णय घ्यायचे अकथ्य

स्व कर्तृत्वा बद्दल नीत
मनात असो आस्तिक्य
सिंहासनआपल्यासाठी
काहीही नाही अ शक्य

**– हेमंत मुसरीक, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## राजस्तरीय मंगळागौर स्पर्धा २१ सप्टेंबरला रंगणार

### आयोजक उपशहर प्रमुख शैलेश पाटील यांची माहिती



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१७, दिवा (ठाणे) :** शिवसेना दिवा शहर पुरस्कृत नवदुर्गा मंगळागौर ग्रुप आयोजित वसा परंपरेचा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा या ब्रीद वाक्या नुसार राज्यस्तरीय मंगळागौर स्पर्धा यंदा दिव्यात २१ संप्टेंबर रोजी जिव्हाळा हॉल येथे संपन्न होणार आहेत यासाठी प्रथम पारितोषिक २१ हजार व आकर्षक सन्मानचिन्ह तसेचे द्वितीय व त्वितीय पारितोषिक ही ठेवण्यात आले आहे. उतेजनार्थ पाच पारितोषिके असून खास आकर्षण म्हणून दिव्यातील महिलांसाठी लक्की ड्रॉ २५ पैठण्या ठेवण्यात आल्या आहेत या उपक्रमात दिव्यातील असंख्य महिला वर्गाने सहभागी व्हावे असे आवाहन आयोजक शैलेश मनोहर पाटील यांनी केले आहे.

दिव्यातील महिलासाठी मा. नगरसेवक व शिवसेनेचे उपशहर प्रमुख शैलेश पाटील हे नेहमीच महिला साठी व्यासपीठ उपलब्ध करून देत आहेत त्यांच्या सहकायनि नक्कीच महिला गरुड भरारी घेतील व दिवा सारख्या शहराचे नाव उज्वल करतील असे कार्यक्रमाच्या संयोजिका किरण शीतकर यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले तसेच मंगळागौर उपक्रमात सहभागी होण्यासाठी महिलांनी लवकरात लवकर संपर्क साधावा असे ही त्यांनी यावेळी कळविले आहे.

## नेरूळ नवी मुंबई येथे महावितरणचा मनमानी कारभार



**अक्षराज : गणेश जाधव**

**दि.१७, नेरुळ (नवी मुंबई) :** नेरुळ नवी समर्थ कृपा बिल्डींग सह परिसरातील अनेक इमारतीमध्ये महावितरणचा मनमानी कारभार चालू आहे.

सोसायटीला,किंवा घरमालकांना कोणतीही पुर्व सुचना न देता इमारतीतील चालू स्थितीत असलेले मिटर परस्पर काढून नवीन मिटर जोडलेले आढळून येत आहे. या नवीन मिटरचा भुर्दंड नक्की कोणाला व किती बसणार हे स्पष्ट नाही, महावितरणची ही भुमिका अत्यंत चुकीची असून या संदर्भात संबंधित सोसायटीला व घरमालकांना पुर्वसुचना देऊन त्यांची संमती असेल तरच मिटरची छेड़छाड़ करावी,अशी नागरिकांनी दैनिक अक्षराज प्रतिनिधी यांच्याशी संपर्क साधून खंत व्यक्त केली.

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा



**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.१७, किनवट (नांदेड) :** किनवट काँग्रेस पक्षाच्या वतीने आज मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी पक्ष कार्यालयात तालुकाध्यक्ष के. सुर्यकांत रेड्डी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी काँग्रेस शहराध्यक्ष गिरीषभाऊ नेम्मानीवार, जेष्ठ नेते मुर्ती कलगोटूवार, माजी उपाध्यक्ष अभय महाजन, अल्पसंख्यांक काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष शमशेर खिच्ची, काँग्रेस सरचिटणीस ईश्वर चव्हाण, महिला अध्यक्षा शेख शहनाज, युवक काँग्रेसचे जावद आलम, कार्यलय सचिव माधवराव खेडकर, ओबीसी उपाध्यक्ष वसंत राठोड, सेवादल अध्यक्ष शरद कोत्तपेल्लीवार, अल्पसंख्यांक शहर सचिव सय्यद अनवरभाई, माजी नगरसेवक लक्ष्मीपती दोनपेल्लीवार, आदिल खानसाब, शेख मुजहिद, स्वामी नुतपेल्लीवार, संजय कोतूरवार यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी मराठवाडा मुक्तीसाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांना अभिवादन करून राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## निफाड तालुका मुस्लिम कमिटी तर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१७, विंचूर (नाशिक) :** ईद-ए-मिलादुन्नबी १५०० निमित्त निफाड तालुका मुस्लिम कमिटी तर्फे हजरत अहमद रजा हॉल, ओझर येथे आयोजित गुणगौरव सोहळ्यात तालुक्यातील एकूण १७२ गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आसिफ शेख यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून राजेंद्र शिंदे, प्रवीण लड्डा, गौरव पानगव्हाणे, मौलाना अनवर अश्फी, सतीश मोरे, नितीन पवार, शामराव कदम, अफजल शेख, गफ्फार शेख, प्रदीप आहिरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

समाजातील शैक्षणिक व सामाजिक उन्नतीवर भर देत बाबाभाई पठाण व अध्यक्ष आसिफ शेख यांनी आपल्या भाषणात सांगितले की, मुस्लिम समाजाने जाती-पोटजातीच्या चौकटीत अडकून न राहता शैक्षणिक, सामाजिक तसेच विविध क्षेत्रात प्रगती साधली पाहिजे. समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी बंधुभाव व सामाजिक सलोखा वृद्धिंगत करणे हीच काळाची गरज आहे.

गुणवंत विद्यार्थ्यांनी या प्रसंगी मनोगते व्यक्त केली तसेच सांस्कृतिक सादरीकरणांद्वारे उपस्थितांचे मन जिंकले. कोरोना व पूरग्रस्त काळात गरीब कुटुंबांना दिलेल्या मदतीसह सामाजिक कार्यात मुस्लिम कमिटीने निभावलेल्या भूमिकेचेही विशेष कौतुक करण्यात आले.

सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी इरफानभाई सय्यद, शरीफ शेख, इम्रान कोतवाल, आसिफ खान पठाण, उमरफारूक काद्री, महेमूद शेख, अब्दुल शेख, नौशाद शेख, तन्वीर राजे, अनवर शेख, बशीर शेख, जावेद पठाण, नईम मुल्ला, शहजाद पठाण, रफिक सय्यद आदींनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.आरिफ मंसूरी व इरम पठाण यांनी केले.

# बहिणाबाईंच्या ह्रदयाला भिडणाऱ्या कवितांनी मुंबईकर भारावले

## 'अरे संसार संसार' बहिणाईंच्या काव्यतांची गीतांची मुंबईत मैफल

**अक्षराज : श्रीकांत जाधव**

**दि.१७, मुंबई :** साधी, सरळ आणि सर्वसामान्यांच्या ह्रदयाला भिडणारया बहिणाबाईंच्या कवितांमधून मानवी भावनांची आणि अनुभवांची खोली जाणवते, त्यांच्या कविता गेय आहेत. त्यामुळे त्या अंतर्मनाला स्पर्श करून विचारप्रवर्तक आहेत.अरे संसार संसार. या बहिणाबाईंच्या अजरामर कवितांवर आधारित काव्य, संगीत आणि भारदस्त निवेदन असलेल्या कार्यक्रमाने मंगळवारी मुंबईकर भारावून गेले.

कवी ना.धों. महानोर यांच्या जयंतीनिमित्ताने यशवंतराव चव्हाण सेंटर, भवरलाल अँड कांताबाई जैन फाउंडेशन आणि परिवर्तन यांच्या संयुक्त विद्यमाने या विशेष संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. यावेळी




प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक, ज्ञानपीठ पुरस्कार विजेते डॉ. भालचंद्र नेमाडे, दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल, डॉ. शामकांत देवरे, राजश्री शिंदे उपस्थित होते. बहिणाबाईंनी निसर्गाशी संवाद साधता साधता सहजतेने लिहिलेल्या, गायलेली काव्य यावेळी सादर करण्यात आली. प्रत्येक गोष्टीकडे सहजतेने पण सखोलपणे पाहण्याचा दृष्टिकोन बहिणाबाईंचा या कार्यक्रमातून रसिकांना अनुभवता आला. कलाकारांनी बहिणाईंच्या खानदेशी शब्दांना सुरांची साथ देत अविस्मरणीय अनुभव दिला. परिवर्तन निर्मित 'अरे संसार संसार' या संगीतमय कार्यक्रमाचा हा ५० वा प्रयोग होता. या कार्यक्रमाची संकल्पना विजय जैन, दिग्दर्शन नारायण बाविस्कर यांनी केले असून निर्मिती प्रमुख हर्षल पाटील आहेत.

तर शंभू पाटील यांच्या अभ्यासपूर्ण भारदस्त निवेदनामुळे कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढते. श्रद्धा कुलकर्णी, सुनीला भोलाणे, प्रतिक्षा कल्पराज, भूषण गुरव, विशाल कुलकर्णी, यश महाजन, रोहित बोरसे, सोनाली पाटील, अक्षय नेहे, समृध्दी पाटील, गोविंद मोकाशी, अजय पाटील, गणेश सोनार हे कलाकार या कार्यक्रमात होते.

माझी माय सरस्वती, माहेर, माहेराले जाणे, काया काया शेतामंदी, खोकली माय, खोप्यामधी खोपा,धरतीच्या कुशीमंदी, आखाजिचा, माणूस माणूस,बिना उपाशीन उले, घरोटा, पिक करपलं, मुंजा, नवरा नवरी आयत पोयत, अरे संसार संसार, माले मायह जीव, मन वढाय वढाय, मायी सासुरवाशीन, सदा जगाच्या कल्याणी या कविता व गाणी सादर केल्या गेल्या. कवी ना.धों. महानोर यांच्या कविता देखील यावेळी सादर करण्यात आल्या. रसिकांनी त्याला उस्फुर्त प्रतिसाद दिला.

# समाज संघटन आवश्यक : ॲड. पुरुषोत्तम सातपुते

## धनोजे कुणबी मध्यवर्ती समितीची बैठक



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, चंद्रपूर :** विदर्भात धनोजे कुणबी समाजाची संख्या जास्त आहे. समाजाचा मुख्य व्यवसाय शेती असल्याने शेती तसेच समाजाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, व्यावसायिक उन्नतीचा विचार करण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन संघटित होणे आवश्यक असल्याचे मत मध्यवर्ती समितीचे अध्यक्ष ॲड. पुरुषोत्तम सातपुते यांनी येथील धनोजे कुणबी समाज मंदिर, लक्ष्मीनगर येथे आयोजित समाज मध्यवर्ती समितीच्या सभेत अध्यक्षीय भाषणात व्यक्त केले. सदर सभेला अतिथी म्हणून नागपूर येथील समाज मंडळाचे अध्यक्ष मधुकर ढोके, चंद्रपूरचे अध्यक्ष श्रीधर मालेकर, गडचिरोलीचे रामकृष्ण ताजने, बुट्टीबोरीचे मुकुंद रोडे, मार्डी येथील सुभाष पिंपळशेंडे, गोंडपिपरीचे प्रफुल्ल आस्वले, राजुरा येथील दौलतराव भोंगळे, पांढरकवडा येथील समाधान धानोरकर, यतमाळचे ॲड. संतोष कुचनकर, वरोराचे सचिव पुंडलिक कौरासे, भद्रावतीचे पांडुरंग टोंगे, प्रा. धनराज आस्वले उपस्थित होते.

यावेळी गडचांदूरचे सचिव निलेश ताजने यांना 'लोकमत'चा ग्लोबल महाराष्ट्र भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. केंद्रीय समिती ही २०१८ मध्ये गठित करण्यात आली तेव्हापासून ॲड. पुरुषोत्तम सातपुते समितीचे अध्यक्ष असून कमेटीच्या माध्यमातून अनेक सामाजिक कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडली जात आहे. समितीने समाज संघटित ठेवण्यात मोलाचे काम केले आहे. नियोजित सभेला समाजाच्या १८ कमिटींपैकी १४ कमिटीचे अध्यक्ष, सचिव, उपाध्यक्ष व गणमान्य समाजबांधव उपस्थित होते. यावेळी बुटीबोरी, सावनेर, मार्डी येथील समाजाची नवीन मंडळे स्थापन करण्यात आलीत. यावेळी मान्यवरांनी समाजाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी प्रत्येकांनी कटिबद्ध राहणे व 'गाव तिथे समाज शाखा' स्थापन करण्याचे ठरविण्यात आले. याप्रसंगी शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांनी उपस्थिती दर्शवून नागपूर येथे १० ऑक्टोबर ला होणाऱ्या ओबीसी मोर्चाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले. यावेळी राज्यस्तरीय उपवर-वधू व शेतकरी मेळावा संदर्भात विचारविनिमय करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्रीय समितीचे सचिव पवन राजुरकर, संचालन ॲड. विलास माथनकर तर आभारप्रदर्शन पांडुरंग टोंगे यांनी केले.

# ड्रोनच्या दिव्यांनी खड्डे बुजत नाहीत, जनता फसत नाही...

## ड्रोन शो च्या आधीच भाजपा आणि आप मध्ये वादाची ठिणगी : प्रशांत कांबळे

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, पुणे :** पुणेकरांच्या मनातील असंतोष, त्रास आणि आक्रोश दाखवण्याची हिंमत भारतीय जनता पार्टीचे खासदार, केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आता दाखवणार आहेत म्हणे! पण पुणेकरांचा खरा प्रश्न काय आहे हे त्यांनी कधी ऐकले का? आज पुणे शहराचे वास्तव असे आहे. रस्त्याला पडलेले प्रचंड खड्डे, प्रचंड वाहतूक कोंडी, तासन्तास अडकलेली जनता, सरकारी शाळांची दुरवस्था, अनेक ठिकाणी शिक्षकच नाहीत. विविध विभागांमध्ये सरकारी कर्मचाऱ्यांची कमतरता, वाढते अतिक्रमण, अनेक मोठ्या कंपन्या महाराष्ट्र सोडून जाणे, रखडलेले डीपी रोड आणि विकासकामातील दिरंगाई, पुण्यात झपाट्याने वाढणारा भ्रष्टाचार, वाढती गुन्हेगारी व कोयता गँगचे थैमान,महिलांवर वाढणारे अत्याचार

नागरिकांवर लादलेला प्रचंड करभार, गिळलेले गार्डन व खेळाची मैदाने, सरकारी दवाखान्यांमध्ये सुविधा नाहीत, रुग्ण त्रस्त या ज्वलंत प्रश्नांवर



एकही ठोस उपाय न करता खासदार महोदय आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त पुण्यामध्ये मोदीजी ७५ ड्रोन लाईट शो करणार आहेत.

पण हे लक्षात ठेवा जनतेच्या जखमा ड्रोनच्या दिव्यांनी झाकता येणार नाहीत! पुणेकरांना हवे आहेत उत्तरं, उपाय आणि खऱ्या अर्थाने विकास दिखाव्याचे शो नव्हे. आम आदमी पार्टी पुणे शहराध्यक्ष प्रशांत कांबळे सामाजिक न्याय विभाग यांनी भाजपवर तीव्र टीका करत स्पष्ट केले आहे की, जे पुणेकरांच्या मनात आहे तेच आकाशात दिसले पाहिजे. जनता समस्यांनी होरपळत आहे. आणि सत्ताधारी मात्र फुशारकीचे सोहळे करीत आहेत. पुणेकरांनी हा अन्याय सहन करणार नाहीत.

# दोरी येथे मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाचा शुभारंभ...!

## तालुक्यातील ७० ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभा घेऊन लाईव्ह प्रक्षेपण

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१७, भद्रावती (चंद्रपूर) :** राज्य शासनाच्या ग्रामविकास विभाग व जिल्ह्य परिषदेच्या मार्गदर्शनात पंचायत समिती भद्रावतीच्या वतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांचा शुभारंभ नंदोरी येथे घेऊन तालुक्यातील ७० ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभा घेऊन राज्यस्तरीय लाईव्ह प्रक्षेपण घेण्यात आले.



या कार्यशाळेचे उद्घाटक व अध्यक्षस्थानी गट विकास अधिकारी आशुतोष सपकाळ, प्रमुख अतिथी सहा.गट विकास अधिकारी डॉ. बंडु आकनुरवार, सरपंच मंगेश भोयर, सामाजिक कार्यकर्ता नरेंद्र जिवतोडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. आसुटकर, उपसरपंच सौ.उषा लांबट, किशोर उमरे, शरद खामनकर, भानुदास ढवस, जयश्री एकरे, विस्तार अधिकारी प्रकाश पारखी, प्रणाली भागवत, ग्राम महसूल अधिकारी रवींद्र लोंढे होते. प्रथम मुख्य मार्गावर साफसफाई करुन स्वच्छतेची शपथ घेण्यातआली. राष्ट्रसंत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून दिव्पप्रज्वलन करण्यात येऊन स्वागत गीताने स्वागत करण्यात आले. गटविकास अधिकारी आशुतोष सपकाळ यांनी राज्य शासनाच्या निर्णयानुसार ग्रामीण भागात ग्रामपंचायतची कार्यक्षमता वाढविणे, सुशासन प्रशासन, मनरेगा योजना अभिसरण, ग्राम पातळीवरील संख्या सक्षमीकरण, उपजिवीका विकास व सहा.गट विकास अधिकारी डॉ. बंडु आकनुरवार यांनी सामाजिक न्याय, सहभाग व श्रमदानातून लोकसहभाग व नरेंद्र जिवतोडे यांनी स्वच्छता ही सेवा मोहीम याविषयी, ग्राम महसूल अधिकारी रवींद्र लोंढे यांनी पांदण रस्त्याविषयी मुद्देसूद मार्गदर्शन केले. यावेळी आदिशक्ती समिती स्थापन करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरपंच मंगेश भोयर संचालन शिक्षक अमित गजभिये, आभार ग्रामपंचायत अधिकारी विकास तेलमासरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विस्तार अधिकारी प्रकाश पारखी, एपीओ सुरज खोडे, राहुल घायवनकर, सरपंच, ग्रामपंचायत पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# लासलगाव बाजार समितीस केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यांची भेट

## कांदा उत्पादन, भाव व निर्यात धोरणावर चर्चा...

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१७, विंचूर (नाशिक) :** खरीप हंगाम २०२५ मधील कांदा पिकाचे क्षेत्र, अंदाजित उत्पादन, सध्यस्थितीतील बाजारभाव, शिल्लक साठा तसेच कांदा निर्यात धोरण या विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी केंद्र सरकारच्या कृषि आणि शेतकरी कल्याण विभागाच्या उच्चस्तरीय अधिकाऱ्यांनी दिनांक १६ सप्टेंबर २०२५ रोजी लासलगाव बाजार समितीला भेट दिली. या भेटीची माहिती समितीचे सभापती ज्ञानेश्वर (डीके) जगताप यांनी दिली.



यावेळी बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर जगताप, उपसभापती संदीप दरेकर, सदस्य मंडळ, शेतकरी व व्यापारी प्रतिनिधींनी खरीप, रब्बी व उन्हाळी कांदा उत्पादन, उत्पादनखर्च, बाजारभाव तसेच शेतकरी व व्यापाऱ्यांना भेडसावणाऱ्या अडचणींबाबत माहिती अधिकाऱ्यांसमोर मांडली. यावेळी कांद्याला आधारभूत किंमत द्यावी, निर्यातीवर अचानक बंदी न आणता पूर्वसूचना द्यावी, शेतकऱ्यांना अनुदान द्यावे, प्रक्रिया उद्योगाला चालना द्यावी, तसेच सफेद कांद्याच्या बियाण्यांची उपलब्धता करून द्यावी अशा मागण्या पुढे आल्या.

व्यापारी वर्गाने कांदा वाहतुकीसाठी पुरेशा रॅकची सोय करण्याची, कांदा निर्यातबंदी न करता दीर्घकालीन धोरण निश्चित करण्याची, इतर देशांशी करार करून निर्यातवाढीला चालना देण्याची तसेच वाहतूक अनुदान उपलब्ध करून देण्याची मागणी केली. नाफेड व एनसीसीएफमार्फत होणारी कांदा खरेदी बंद करावी, किंमत स्थिरीकरण निधीचा वापर योग्य पद्धतीने करावा अशीही मते व्यक्त झाली.

या बैठकीस केंद्र शासनाचे संचालक (फळोत्पादन सांख्यिकी) सुचित्रा यादव, उपसंचालक (फळ उत्पादन तंत्रज्ञान) रविंद्र कुमार, एनएचआरडीएफ चे केंद्रप्रमुख डॉ.सुजय पांडेय, अवर सचिव (एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान) मनोज के. यांची विशेष उपस्थिती होती. तर राज्य पातळीवर विभागीय कृषि सहसंचालक सुभाष कोटकर, कृषि उपसंचालक महेश वेटेकर, जिल्हा अधीक्षक (कृषि) रविंद्र माने, उपविभागीय कृषि अधिकारी तानाजी खर्डे, जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) फयाज मुलाणी, सहाय्यक निबंधक कांतीलाल गायकवाड, बाजार समितीचे सदस्य जयदत्त होळकर, राजेंद्र डोखळे, छबुराव जाधव, सुवर्णा जगताप, डॉ. श्रीकांत आवारे, प्रविण कदम, बाळासाहेब दराडे, सचिव नरेंद्र वाढवणे, सहसचिव प्रकाश कुमावत, व्यापारी प्रतिनिधी नितीन जैन, मनोज जैन, विकास सिंग व शेतकरी प्रतिनिधी अभिजीत डुकरे उपस्थित होते. याप्रसंगी बाजार समितीच्या वतीने आलेल्या मान्यवर अधिकाऱ्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

# पारनेर तालुका राष्ट्रवादी युवती प्रवक्तेपदी जयश्री रोकडे

## आमदार काशिनाथ दाते यांच्या मान्यतेने निवड

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, पारनेर (अहिल्यानगर) :** वडगाव सावताळ येथील सामाजिक कार्यकर्त्या जयश्री प्रदिप रोकडे यांची पारनेर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गटाच्या) तालुका युवती प्रवक्ता पदी नियुक्ती झाल्याबद्दल वडगाव सावताळ व खामकर झाप ग्रामस्थांच्या वतीने रोकडे यांचा अभिनंदन करून सत्कार करण्यात आला.

जयश्री रोकडे ह्या आमदार काशिनाथ दाते यांच्या कुटुंबातील अतिशय जवळचे विश्वास म्हणून ओळखले जातात. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून सातत्याने प्रश्न मांडणारे जयश्री रोकडे यांनी तालुक्यात महिलंचे संघटन अधिक भक्कम उभे केले आहे. युवती प्रदेशाध्यक्षा संध्याताई सोनवणे यांनी व आमदार काशिनाथ दाते यांच्या मान्यतेने रोकडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. रोकडे यांच्या नेतृत्वाखाली युवती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्याला बळकटी येण्याची अपेक्षा असल्याचे पारनेर तालुका युवती अध्यक्षा अपर्णा खामकर यानी सांगितले.

यावेळी रोकडे म्हणाल्या की, पक्षाने व वरिष्ठांनी जो विश्वास टाकला आहे त्याला कोणत्याही प्रकारचा तडा जाऊ देणार नाही. पक्षाची भूमिका,तत्व आणि विचार जनतेपर्यंत पोहचविण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी माजी मुख्याध्यापक बी.टी.खामकर, भाऊसाहेब दाते, बाबासाहेब दाते, हनुमंत ठाणगे,



दादाभाऊ रोकडे, प्रेमानंद महाराज आंबेकर,संदिप व्यवहारे, सुनील खामकर, राजेंद्र रोकडे, गुलाब रोकडे, राजेंद्र भोसले, सुनील रोकडे, अर्जुन रोकडे, अर्जुन साळुंके, भाऊसाहेब जांभळकर, सुर्याभान जाधव,बाळू रोकडे, बाबाजी खामकर, तुकाराम रोकडे, ज्ञानदेव रोकडे, नामदेव रोकडे, अशोक रोकडे, दत्ता शिंदे, शिवा भनगडे, प्रदिप रोकडे, पांडुरंग निवडुंगे, महादू रोकडे, दामू पवार, बाळासाहेब रोकडे, देवराम जांभळकर, आप्पा रोकडे, सुभाष खंडागळे यांच्यासह अनेक ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठवाडा मुक्ती दिनाच्या ध्वजारोहणास वैद्यकीय अधिकाऱ्यांची गैरहजेरी

## स्थानिक भाजप पदाधिकाऱ्यांनी केली कारवाईची मागणी

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१७, मुदखेड (नांदेड) :** मराठवाडा मुक्ती दिनाच्या शासकीय ध्वजारोहणास मुदखेड ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकाऱ्यांची गैरहजेरी असल्याचे निदर्शनास आले.आरोग्य धनसंपदा हा रयतेचा अधिकार हे ब्रीदवाक्य आरोग्य विभागाचे असून या ब्रीदवाक्याचा हरताळ फासत ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या ध्वजारोहण कार्यक्रमास दांडी मारल्याने मुदखेड भाजप पदाधिकाऱ्यांनी थेट जिल्हा शल्य चिकित्सकांकडे गैरहजर राहणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी निवेदन दिले आहे. एकीकडे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन तर दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत असताना १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर हा १५ दिवसीय कालावधी सेवा पंधरवडा म्हणून साजरा केला जात आहे यात स्वच्छता अभियानांतर्गत ग्रामीण रुग्णालयात भाजपचे पदाधिकारी गेले असता ध्वजारोहण कार्यक्रमास वैद्यकीय अधिक्षकांसह अन्य ०६ अधिकारी व कर्मचारी यांनी दांडी मारल्याने रुग्णांविषयी किती गंभीर आहेत याची प्रचिती दिसून आली या दांडी बहाद्दर कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करावी असे निवेदन जिल्हा शल्यचिकित्सकांकडे दिले आहे निवेदनावर प्रवीण गायकवाड, रामसिंग चव्हाण, गोविंद बिस्मिल्ले, संजय सोनटक्के, संजय चव्हाण, जयश्रीताई देशमुख, राम आबादार, संजय आऊलवार, विनोद चंद्रे, नितीन चौदंते, प्रभाकर पांचाळ आदींसह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक वृषाली येमेकर यांच्याशी संपर्क साधला असता जिल्ह्याचे पालकमंत्री आलेले असल्याने जिल्हा शल्य चिकित्सकांनी नोडल ऑफिसर म्हणून माझी नियुक्ती करण्यात आली असल्याने मी ध्वजारोहण कार्यक्रमास हजर नव्हते. गैरहजर राहणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना नोटीस दिली असून ते काय उत्तर देतात यावर पुढील कारवाई ठरविण्यात येईल.

**– वृषाली येमेकर (वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय मुदखेड)**

# दिव्यांग अपंग प्रमाणपत्र शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, अहिल्यानगर :** निलेश लंके अपंग कल्याणकारी प्रतिष्ठान व रविंद्र राजदेव यांच्या संयुक्त संकल्पनेतून अहिल्यानगर शहरातील जिल्हा ग्रामीण रुग्णालयात बुधवार, दिनांक १७ सप्टेंबर मोतीबिंदू शिबिराचे आयोजन केले होते. सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत आयोजित केलेल्या या शिबिरात पारनेर तालुक्यातील ४५० आणि दक्षिण लोकसभा मतदारसंघातून एक हजार अशा तब्बल १४५० दिव्यांग अपंग नागरिकांनी सहभाग घेतला. या शिबिरात अपंग प्रमाणपत्रांचे नूतनीकरण आणि नवीन प्रमाणपत्रांचे वितरण केले जाणार आहे. शिबिरात अपंग व्यक्तींनी तपासणी करून घेतली. पात्र व्यक्तींना प्रमाणपत्र दिले जाणार आहेत. हे शिबिर रविंद्र राजदेव व सुनील करंजुले यांच्या मार्गदर्शनाखाली अहिल्यानगर जिल्हा रुग्णालय येथे घेण्यात आले होते. शिबिर यशस्वी करण्यासाठी ऍड. उज्वला घोडके, पोपट गुंड, सयाजी भाईक, विशाल गागरे, भानुदास आग्रे,माधव आग्रे, मारुती आग्रे, जनार्दन चौधरी, भाऊसाहेब चौधरी, सुनील चौधरी, अनिल आहेर, संदेश आहेर, वैभव आग्रे, प्रणव पानसरे, कैलास राजदेव यांनी विशेष मेहनत घेतली.



# भाजी विक्रेत्यांसाठी महाआरोग्य शिबिराचे आयोजन

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१७, पनवेल :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पनवेल मनपा आणि पनवेल तालुका प्रेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल शहरातील भाजीविक्रेत्यांसाठी येत्या शुक्रवार, दिनांक १९ सप्टेंबर २०२५ रोजी महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.या आरोग्य शिबिरात भाजी विक्रेत्यांना आयुष्यमान भारत डिजिटल मिशन कार्ड (ABDM), पंतप्रधान जन आरोग्य योजना (PMJAP) अंतर्गत नोंदणी आणि आयुष्यमान वयोवंदना कार्डचे वाटप करण्यात येणार आहे त्याचप्रमाणे नेत्र तपासणी, बालरोग, स्त्रीरोग, सर्जन, अस्थिरोग, फिजिशियन, मधुमेह, उच्च रक्तदाब, हाडचिकित्सा, दंतचिकित्सा या सर्व तपासण्यांबरोबर सर्व प्रकारचे औषध आणि रक्ताच्या चाचण्या देखील मोफत करण्यात येणार आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन पनवेल जुने भाजी मार्केट, पंचमुखी मारुती सर्कल या ठिकाणी सकाळी ठीक ११ वा. करण्यात आले आहे. या महाआरोग्य शिबिराचा सर्व भाजी विक्रेत्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे व पनवेल तालुका प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे आणि सर्व पदाधिकारी व सदस्यांनी केले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन पनवेल जुने भाजी मार्केट, पंचमुखी मारुती सर्कल या ठिकाणी सकाळी ठीक ११ वा. करण्यात आले आहे. या महाआरोग्य शिबिराचा सर्व भाजी विक्रेत्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे व पनवेल तालुका प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे आणि सर्व पदाधिकारी व सदस्यांनी केले आहे.

# थोडक्यात

## महाबळेश्वर नगरपालिकेच्या माध्यमातून स्वच्छता पंधरवडा साजरा

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.१७, महाबळेश्वर (सातारा) :** केंद्र सरकारच्या स्वच्छता ही सेवा उपक्रमांतर्गत, महाबळेश्वर गिरीस्था नगरपालिकेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी योगेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली महाबळेश्वर गिरीस्थान नगरपालिकेच्या हद्दीत स्वच्छतेचा सक्रियपणे प्रचार करण्याच्या दृष्टीने दिनांक १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०२५ दरम्यान स्वच्छता पंधरवडा राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाअंतर्गत शहरातील नागरिकांना स्वच्छते विषयी जागृती निर्माण व्हावी व शहरात स्वच्छतेचा प्रचार व प्रसार करण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.



स्वच्छता ही सेवा या उपक्रमाची सुरुवात बुधवार, दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी गिरीस्थान प्रशाला येथून स्वच्छतेची शपथ घेऊन करण्यात आली. यावेळी महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषेदेचे वरिष्ठ लिपिक आबाजी ढोबळे, कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी अमित माने, पाणीपुवठा व स्वच्छता अभियंता प्रदीपकुमार बोरगे, संगणक अभियंता मंगेश माने, आरोग्य निरीक्षक प्रमोद कुंभार, स्थापत्य अभियंता मुरलीधर धायगुडे, वृक्षाधिकारी कल्याण हिवरे, लेखापाल ज्ञानेश्वर मोहिते, लेखापरीक्षक सचिन कदम, स्वच्छता मुकादम मनोज चव्हाण व अयुब वारुणकर, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शाळेचे विद्यार्थी, हिलदारीचे राम भोसले व टीम उपस्थित होते.तसेच स्वच्छता पंधरवाडा दरम्यान शहरात पुढील दिवसांमध्ये विविध उपक्रम राबविले जाणार आहेत ज्यामध्ये महिलांना कचऱ्याचे वर्गीकरण सोप्या पद्धतीने समजावे यासाठी सामुदायिक बैठका, शालेय विद्यार्थी यांच्याकरिता कचरा वर्गीकरण जनजागृती संदर्भात सत्र, रेड डॉट बैठका, स्वच्छता अभियान, एकल वापर प्लास्टिक बंदी बाबत जनजागृती व दंडात्मक कार्यवाही, शहरातील सार्वजनिक ठिकाणी पथनाट्य, स्वच्छता फेरी, स्वच्छता कर्मचारी यांचे शासकीय योजनांमध्ये नोंदणी करणे तसेच त्यांचा सन्मान करणे असे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.या उपक्रमात शहरातील सर्व शाळा, हॉटेल, सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था, सर्व संघटना, शासकीय संस्था आणि स्थानिक रहिवाशांनी उत्साही सहभाग नोंदवून स्वच्छ, सुंदर व हरीत वातावरण राखण्यासाठी एक मजबूत व सामूहिक प्रयत्न दर्शवीण्यात यावा असे अवाहन महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरीषेदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी योगेश पाटील यांनी केले.

## कौशल्य विकासातून औद्योगिक विकासाला चालना - उन्मेष पाटील

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१७, खंडाळा (सातारा) :** कौशल्य शिक्षणाच्या माध्यमातून तरुणाईला आत्मनिर्भरतेचा मार्ग खुला होतो. आजच्या स्पर्धेच्या युगात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करण्यासाठी व औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी कौशल्य शिक्षण महत्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन एसीजी कंपनीचे महाव्यवस्थापक उन्मेष पाटील यांनी एसीजी कौशल्य विकास केंद्र पळशीरोड शिरवळ ता.खंडाळा येथील वर्धापन दिनाच्या सोहळ्यात केले. यावेळी एसीजी केअर्स फाउंडेशनचे वरिष्ठ व्यवस्थापक चंद्रशेखर वाळके, एसीजी कंपनीचे मानव संसाधन व्यवस्थापक गायत्री देशपांडे, फार्मा पॅकच्या व्यवस्थापिका गौरी पेंडसे, कॅप्सूलचे वरिष्ठ व्यवस्थापक परिमल पराग, सचिन दद्दी मिटकॉनचे डॉ.गणेश खामगळ, कोमल गोंजारी, डॉ.किरण गिरी, ऐश्वर्या खोब्रागडे,संतोष साळुंके आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मिटकॉन फोरमचे संचालक डॉ.गणेश खामगळ यांनी केले. ते म्हणाले की, कौशल्य विकास हा उद्योग,तंत्रज्ञान आणि आर्थिक प्रगतीचा आधार असून प्रशिक्षित व कौशल्य संपन्न कामगारांमुळे उद्योग अधिक कार्यक्षम व दर्जेदार उत्पादन करू शकतात. कौशल्य विकास केंद्रामुळे शिरवळ परिसरात कुशल मनुष्यबळ उपलब्ध होत आहे. कोमल गोंजारी यांनी कौशल्य विकास केंद्रातील तक्रार निवारण समितीचे महत्त्व याबद्दल विद्यार्थ्यांशी सविस्तर चर्चा केली. वर्धापनदिनाचे औचित्य साधत कौशल्य विकास केंद्रातील विषय तज्ञ व यशस्वी युवा प्रशिक्षणार्थींचा यावेळी गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कौशल्य विकास केंद्राचे प्रमुख सुहास परिहार यांनी केले. तर आभार प्रदर्शन वैशाली धनावडे यांनी केले.



## आ.गुट्टे यांनी वृक्षारोपन करून पीक नुकसानीची ही केली पाहणी

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.१६, पालम (परभणी) :** पालम तालुक्यातील सिरपूर येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाची सुरुवात आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आली. तदनंतर त्यांनी अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीची पाहणी करीत जवळा व पेठशिवनी येथील शेतकऱ्यांना दिलासा दिला. महसूल व वन विभागाच्या वतीने १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत केरवाडी ते सिरपूर दरम्यानच्या शिव रस्त्यावर डॉ.रत्नाकर गुट्टे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून या अभियानाची सुरुवात केली. प्रसंगी उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर, तहसीलदार उषाकिरण शृंगारे, नायब तहसीलदार भागवतराव तेलभरे, मंडळ अधिकारी राजकुमार चिकटे, तलाठी मनीष गुंगे, कृषी सहाय्यक विवेक ब्याळे, भिसे, पवन सोन्नर, सरपंच भास्कर लांडे, माजी सरपंच राहुल आवरगंड, भाऊराव लांडे, बालाजी बिडकर, नागनाथ कदम, विष्णू आवरगंड, प्रकाश लांडे, स्वप्निल आवरगंड, दत्तराव आवरगंड, बबन महाराज पांचाळ, बाळासाहेब लांडे, दिलीप शेवटे, ओमकार लांडे, भागवत लांडे, पशुपती शेवटे, युवराज आवरगंड, नागनाथ लांडे, सुरेश लांडे, काशिनाथ बचाटे, शंकर कदम, चिंतामणी कुरे, मुन्ना आवरगंड, आबाजी लांडे, नागोराव लांडे यांच्यासह आदी उपस्थित होते.



महसूलच्या वतीने या अभियानाची माहिती देऊन विविध उपक्रम राबविण्याच्या सूचना दिल्या. लोकसहभागातून गावच्या सर्वांगीण विकासासाठी हे अभियान उपयुक्त ठरणार असल्याची माहिती देखील देण्यात आली.तदनंतर आ.गुट्टे यांनी जवळा, पालम आणि पेठशिवनी येथे बांधावर जाऊन पीक नुकसानीची पाहणी केली. त्यांनी शेतकऱ्यांकडून नुकसानीची माहिती घेत शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. नगदी पिकांच्या नुकसानीबाबत सविस्तर आढावा देखील त्यांनी घेतला. यावेळी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष वसंतराव सिरस्कर, माजी जि.प.सदस्य रत्नाकर शिंदे, आ.गुट्टे मित्र मंडळाचे प्रभारी माधवराव गायकवाड, युवा तालुकाध्यक्ष बाळासाहेब ढोले, युवा शहराध्यक्ष विजयकुमार घोरपडे, नगरसेवक अजीम पठाण, उबेद पठाण, गणेश घोरपडे, भगवान सिरस्कर, राहुल शिंदे यांच्यासह आदी उपस्थित होते.